# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३८२-२२** **दिनांक ११/१२/२०२२**

मिरा-भाईंदर, वसई-विरार कार्यक्षेत्रातील मांडवी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १०/१२/२०२२ रोजी ११.०० वाजता ते ११.३० वाजताच्या दरम्यान फिर्यादी महिला ही तिच्या १० महिने वयाच्या मुलीसोबत मस्तान नाका, मनोर येथे जाण्यासाठी चिंचोटी ते वापी असे प्रवासी घेउन जाणाऱ्या सफेद रंगाच्या इको व्हॅन रजिस्ट्रेशन क्रमांक जी.जे.१५ सी.जे. ११३७ मधुन प्रवास करत असताना घडलेल्या घटनंतर फिर्यादी आणि त्यांच्या मुलीला उपचारांकरीता रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले असता कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांनी फिर्यादी यांच्या मुलीला तपासुन दाखलपुर्व मयत झाल्याचे सांगीतले. फिर्यादी महिलेचा जबाब नोंद करुन मांडवी पोलीस ठाणे गु.रजि.नं. १९२/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३०२, ३५४, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्हयातील आरोपी व्हॅन चालक याला अटक करण्यात आली आहे.

घटनेची संवेदनशिलता व गांभीर्य लक्षात घेवुन गुन्हयाचा तपास गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. सदरच्या घटनेचा वेगवान आणि चोख तपास करण्यासाठी गुन्हे शाखा, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय कटीबध्द असुन तपासावर पोलीस उप आयुक्त, गुन्हे तसेच पोलीस आयुक्त वैयक्तिक देखरेख करीत आहेत.

-----oo------